31-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 30-05-2025 23:40 Page 1



आधी कोलवाचे प्रदूषण दूर करा!

≫ पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



आरसीबीची फायनलमध्ये धडक

≫ पान ४ वर

वेर्णा, शनिवार, ३१ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 268 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 31 May 2025 | Pages 4 | ₹ 4

# १०० टक्के साक्षर : गोव्यात एकही अशिक्षित नाही !

## ३९व्या राज्य स्थापना दिनानिमित्त केंद्रीय शिक्षण मंत्रालयाची घोषणा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ३० : गोव्याने आपल्या ३९व्या राज्य स्थापना दिनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने उल्हास भारत साक्षरता कार्यक्रमा' अंतर्गत गोवाला पूर्ण साक्षर राज्यम्हणून घोषित केले आहे अशी माहिती मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी शुक्रवारी दिली.**



पणजी येथील कला अकादमीच्या सभागृहात आयोजित राज्य स्थापना दिन कार्यक्रमात बोलताना डॉ प्रमोद सावंत यांनी गोवा १00 टक्के साक्षर झाल्याचे सांगितले. सध्या गोव्याचा साक्षरता दर ९९.७२% असून, त्याने १00% साक्षरता साध्य केलेल्या राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या विशेष यादीत स्थान मिळवले आहे. या यादीत मेघालय आणि लडाख यांचाही समावेश आहे.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी यावेळी आपल्या भाषणात सांगितले की, २०20 च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीतून शिक्षण क्षेत्र मजबूत करण्यासाठी आम्ही घेतलेल्या सामूहिक प्रयत्नांना यश आले आहे. ही कामगिरी त्या प्रयत्नांचे फलित आहे.

साक्षरता कार्यक्रमांतर्गत गोव्यात ६,२९९ निरक्षर व्यक्ती ओळखण्यात आल्या होत्या. त्यापैकी २,१३६ जणांनी प्रशिक्षण पूर्ण करून साक्षरतेची पूर्तता केली. उर्वरित ४,१६३ जणांना वयोमर्यादा किंवा वैद्यकीय अडचणींमुळे सहभाग घेणे शक्य झाले नाही. विशेष म्हणजे, राज्यातील ८२ ग्रामपंचायतींनी १00% साक्षरता प्राप्त केली आहे, तर काहींनी राष्ट्रीय मानकांपेक्षा अधिक म्हणजे ९५% पेक्षा जास्त साक्षरता गाठली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, साक्षरतेच्या व्याख्येत आता केवळ अक्षरओळख नव्हे, तर 'डिजिटल आणि आर्थिक साक्षरता' यांचाही समावेश करण्यात आला आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या सहसचिव (शिक्षण) अर्चना अवस्थी यांनी या कामगिरीचे कौतुक करत गोवाच्या या टप्प्याला ऐतिहासिक असे संबोधले. ही कामगिरी राज्याच्या सर्वसमावेशक विकासदृष्टीचा आणि शिक्षणासाठी असलेल्या दीर्घकालीन वचनबद्धतेचा परिपाक आहे. गोवा इतर राज्यांसाठी प्रेरणादायी ठरला आहे, असे त्या म्हणाल्या.

राज्याच्या विकास प्रगतीविषयी बोलताना मुख्यमंत्री सावंत म्हणाले की, राज्य सरकारने घेतलेल्या १३ महत्त्वाकांक्षी योजनांपैकी सुमारे ८0% योजनांची अंमलबजावणी पूर्ण झाली असून, उर्वरित योजनाही लवकरच प्रत्यक्षात येतील.

ते पुढे म्हणाले, गोव्याच्या सर्वांगीण विकासात सहभागी होण्यासाठी राज्यातील सर्व नागरिकांनी, विशेषतः युवकांनी, 'विक्षित गोवा २०३७' या महत्त्वाकांक्षी मिशनचा भाग व्हावे. यासाठी राज्य सरकार लवकरच 'व्हिजन डॉक्युमेंट' प्रसिद्ध करणार आहे.

यावेळी मुख्यमंत्री सावंत यांनी स्वातंत्र्यसैनिक आणि गोव्याच्या विकासात योगदान देणाऱ्या सर्व मान्यवरांना अभिवादन केले. त्यांनी 'ओपिनियन पोल' आणि 'भाषा आंदोलन' यांसारख्या ऐतिहासिक घटनांचे स्मरण करून गोव्याच्या स्वतंत्र ओळखीतील त्यांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले.

पान २ ▶

## ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोफत निवासी नीट-जेईई प्रशिक्षण केंद्राची घोषणा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ३०** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अशा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये संधी उपलब्ध करून देण्यासाठी गोवा विधानसभेचे अध्यक्ष रमेश तवडकर यांनी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. त्यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याची अधिकृत घोषणा केली आहे.

या उपक्रमाची सुरुवात चालू शैक्षणिक वर्षापासून होणार असून, तो केपे सांगे आणि काणकोण येथील विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून २००८ पासून चालू असलेल्या निवासी शाळा प्रकल्पावर आधारित आहे. सध्या ही शाळा विज्ञान शाखेतील १२ वीपर्यंतचे शिक्षण पुरवते. आता या निवासी केंद्रामार्फत प्रवेश परीक्षांचे सखोल मार्गदर्शनही दिले जाणार आहे. यासाठी पुणे येथील आचार्य अकादमीसोबत भागीदारी करण्यात आली असून, तेथील अनुभवी प्राध्यापक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देतील. संपूर्ण प्रशिक्षणक्रम मोफत राहणार असल्याची माहिती तवडकर यांनी दिली.

नव्या उपक्रमांतर्गत एकूण १५० विद्यार्थ्यांसाठी जागा उपलब्ध असून, त्यापैकी १00 जागा अनुसूचित जमाती (एसटी) घटकातील विद्यार्थ्यांसाठी आणि उर्वरित ५0 जागा सामान्य श्रेणीतील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. हा प्रकल्प ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण व आवश्यक संसाधने उपलब्ध करून देत, त्यांच्या प्रगतीसाठी समान संधी निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करतो.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रात यश मिळवण्याची संधी मिळावी, हा आमचा प्रमुख उद्देश आहे. शहरातील आणि खेड्यांतील शिक्षणातील तफावत भरून काढण्यासाठी हे पाऊल उचलले आहे,असे तवडकर यांनी स्पष्ट केले.

प्रवेश परीक्षांच्या तयारीसोबतच या निवासी केंद्रात विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास आणि मानसिक तयारीसाठी विशेष सत्रे घेतली जातील. स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व पैलूंवर लक्ष केंद्रित केले जाईल.

या घोषणेला दक्षिण गोव्यातील पालक, शिक्षक आणि शैक्षणिक संस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. अनेकांनी हा उपक्रम ग्रामीण शिक्षणातील असमतोल दूर करण्याच्या दिशेने टाकलेले सकारात्मक पाऊल असल्याचे मत व्यक्त केले आहे. या निवासी प्रशिक्षण केंद्राच्या पहिल्या बॅचसाठी प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून, अर्जदारांची निवड शैक्षणिक गुणवत्ता आणि पात्रतेच्या निकषांवर आधारित केली जाणार आहे.

## निवडक

### फटाक्याच्या कारखान्यात स्फोट; पाच ठार

**चंदिगड, दि. ३०** : पंजाबमधील श्री मुक्तसर साहिब जिल्ह्यातील एका गावात शुक्रवारी सकाळी फटाका कारखान्यात स्फोट झाला. या स्फोटात पाच जणांचा मृत्यू झाला आणि वीस जण जखमी झाले. ही घटना सिंगावाली-कोटली मार्गावरील दोन मजली काखान्यात घडली. स्फोटामुळे कारखान्याची दोन मजली इमारत कोसळली. फटाका हाताळणीत हयगय झाल्यामुळे स्फोट झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. पण स्फोटाचे नेमके कारण अद्याप समजलेले नाही. स्थानिक पोलीस स्फोट प्रकरणी तपास करत आहेत.

फटाका कारखान्यातील स्फोटात जखमी झालेल्यांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतांचे शवविच्छेदन केल्यानंर मृतदेह नातलगांच्या ताब्यात दिले जाणार आहेत. मृतांच्या कुटुंबियांना आणि जखमींना सरकारकडून मदत मिळण्याची शक्यता आहे. स्फोटाचे कारण जाणून घेण्यासाठी पोलिसांनी तज्ज्ञांच्या सहकार्याने तपास सुरू केला आहे. ताज्या घटनेमुळे फटाका कारखान्यांमध्ये सुरक्षेसाठीच्या नियमांचे पालन होते की नाही ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### कोरोनाने पुन्हा चिंता वाढवली



**नवी दिल्ली, दि. ३०** : देशात पुन्हा एकदा हळू हळू कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे पाहायला मिळत आहे, देशात कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या १000 पेक्षा जास्त झाली आहे. राजधानी दिल्ली, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, कर्नाटक, केरळ या राज्यांमध्ये कोरोनाचे रुग्ण वाढत आहेत. ताज्या आकडेवारीनुसार दिल्ली - एनसीआरमध्ये कोरोनाबाधितांची संख्या १0४ वर पोहोचली आहे. गुरुग्राममध्ये शुक्रवारी नव्या तीन रुग्णांची नोंद झाली. गेल्या दहा दिवसांमध्ये शहरात १६ नव्या कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची नोंद झाली आहे.

राजधानी दिल्लीमध्ये कोरोनाच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे, यासंदर्भात माहिती देताना मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी म्हटले आहे की, दिल्लीमध्ये कोरोना रुग्णाची संख्या वाढत आहे, मात्र काळजी करण्याचं काही कारण नाही, रुग्णालय आणि सरकार अलर्ट मोडवर आहेत. सध्या स्थितीमध्ये दिल्लीत १९ कोरोनाबाधित रुग्णांचा उपचार रुग्णालयात सुरू आहे, तर बाकी सर्व रुग्णांना घरीच क्वॉरटांईन करण्यात आले आहे. जरी रुग्ण काही प्रमाणात वाढत असेल तरी चिंता करण्याचं कारण नाही, कारण अजूनही परिस्थिती नियंत्रणात आहे.

### देशासह राज्यात पुन्हा जोरदार पाऊस

**मुंबई, दि. ३०** : यंदा देशासह महाराष्ट्रात मान्सून वेळेपूर्वीच दाखल झाला आहे, सध्या अनेक राज्यांमध्ये जोरदार पाऊस सुरू आहे. भारतीय हवामान विभागाकडून आता पुन्हा एकदा पुढील तीन दिवस अनेक राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिमेकडून जोरदार वारे वाहणार असून, त्याचा परिणाम म्हणजे केरळमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार ३१ मे, १ जून आणि २ जून रोजी केरळसह, पश्चिम बंगाल, सिक्कीम या राज्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. तर पुढील दोन दिवस गोवा, कर्नाटक, तामिळनाडू, आणि महाराष्ट्रात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यानंतर पावसाचा जोर काहीसा कमी होईल असा अंदाज आयएमडीनं वर्तवला आहे.

## गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाविरुद्ध यूजीएफची तक्रार

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ३०** : पेडणे तालुक्यातील धारगळ येथे प्रस्तावित एकात्मिक रिसॉर्ट प्रकल्पास दिलेल्या मंजुरीच्या पार्श्वभूमीवर, युनायटेड गोअन्स फाउंडेशनने गोवा गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाविरुद्ध गंभीर स्वरूपाची औपचारिक तक्रार सादर केली आहे.

यूजीएफ चे अध्यक्ष आशिष कामत यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत - जे आयपीबी (गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ) चे अध्यक्ष देखील आहेत , तसेच मुख्य सचिव डॉ. व्ही. कँडेव्हेलू, महसूल सचिव संदीप जॅक आणि इतर मंडळ सदस्यांना ही तक्रार पाठवली आहे. कामत यांनी आयपीबी कडून डेल्टा कॉर्प लिमिटेडला मंजुरी देताना गंभीर निष्काळजीपणा, प्रक्रियात्मक नियमांचे उल्लंघन आणि हेतुपुरस्सर गैरवर्तन झाल्याचा आरोप केला आहे.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील आयपीबी ने डेल्टा कॉर्पला मंजुरी देताना महत्त्वाच्या तथ्यांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याचे पुराव्यांवरून स्पष्ट होते, असे कामत यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

तक्रारीनुसार, आयपीबी ने प्रस्तावित प्रकल्पाच्या जागेचे वास्तव, स्थानिक आक्षेप आणि पर्यावरणीय प्रभाव याकडे दुर्लक्ष केले. कामत यांनी आयपीबी च्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, यामध्ये वैयक्तिक हितसंबंध गुंतले असल्याचा संशय व्यक्त केला आहे.

ही प्रक्रिया राज्याच्या प्रशासकीय पारदर्शकतेच्या तत्त्वांना छेद देणारी आहे. मंजुरी देताना घेतलेली घाई आणि तडजोडीची भूमिका लक्षात घेता, ही संपूर्ण प्रक्रिया शंका निर्माण करणारी ठरते, असे कामत यांनी म्हटले आहे.

यूजीएफ ने तक्रारीसोबत दस्तऐवजांची पूर्तता करून, मंजुरी प्रक्रियेत झालेल्या अनियमिततांचे पुरावे सादर केले आहेत. तसेच, त्वरित कारवाई न झाल्यास,आयपीबी च्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्याचा इशाराही फाउंडेशनने दिला आहे.

जर योग्य कारवाई झाली नाही, तर आम्ही गोवा खंडपीठात याचिका दाखल करूनआयपीबीच्या निर्णयाला आव्हान देणार असून, जबाबदार अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाईची मागणी करणार आहोत, असे कामत यांनी स्पष्ट केले. या प्रकरणामुळे गोव्यातील गुंतवणूक मंजुरी प्रक्रियेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. अद्याप राज्य सरकार किंवा गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाकडून यासंदर्भात कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही.

## मारुतीगड टेकडीचा विध्वंस: नागरिकांमध्ये संताप

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ३०** : पणजीतील मळा भागात मारुतीगडजवळील टेकडी तोडण्याच्या घटनेमुळे जनतेत चिंता निर्माण झाली आहे, त्यामुळे पणजी शहर महानगरपालिकेचे (सीसीपी) महापौर रोहित मोन्सेरात आणि स्थानिक रहिवासी शुक्रवारी घटनास्थळी जमले.



या बेकायदेशीर कृत्यामागील व्यक्तींना त्यांच्या घरापासून सरकारी मालमत्तेवर तात्पुरता रस्ता बांधण्यात आला होता, त्या रस्त्यावर सहज प्रवेश हवा होता. सुरू असलेल्या उत्खननामुळे पर्यावरणीय परिणाम आणि संभाव्य सुरक्षितता धोक्यांबद्दल रहिवाशांनी चिंता व्यक्त केली. माहिती मिळताच, महापौर रोहित मोन्सेरात , उपमहापौर संजीव नाईक आणि वॉर्ड नगरसेवक अदिती चोपडेकर यांनी घटनास्थळी धाव घेतली.

भारत सरकारच्या मालमत्तेत मालक बेकायदेशीरपणे जमीन भरत असल्याचे मोन्सेरेट म्हणाले. त्यांनी सांगितले की, पूर्वी सीसीपीने मालकाला कारणे दाखवा नोटीस बजावली होती आणि काम थांबवण्याचा आदेशही दिला होता. परंतु ते अवमानित करण्यात आले, असे ते म्हणाले आणि त्यांनी तातडीने सीसीपी कर्मचाऱ्यांना बेकायदेशीर कृत्ये झाली आहेत का आणि मालमत्ता मालकाने पूर्वीचे आदेश मोडले आहेत का हे तपासण्याचे निर्देश दिले.

महापौर म्हणाले, ते अशा प्रकारची कामे इतरत्र कुठेही करू शकतात पण पणजीमध्ये नाही, लोक ते सहन करणार नाहीत. सीसीपी त्याची प्रक्रिया देखील करेल. चोपडेकर म्हणाले की जमीन मालकाने नूतनीकरणासाठी परवानगी मागितली होती आणि आता मुख्य रस्त्यावर सहज प्रवेश करण्यासाठी जमीन भरण्याचे काम सुरू आहे.

## 'स्टेल्थ' लढाऊ विमान निर्मितीला संरक्षण मंत्रालयाची मान्यता

नवी दिल्ली, दि. ३० :




भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने अत्याधुनिक पाचव्या पिढीतील स्टेल्थ' लढाऊ विमानांच्या स्वदेशी निर्मितीसाठी औपचारिक मान्यता दिली असून, या संदर्भात संरक्षण उत्पादन कंपन्यांकडून 'अभिव्यक्ती स्वारस्य' मागवण्यात आली आहे.

सध्या फक्त अमेरिका, रशिया आणि चीन हे देश पाचव्या पिढीतील स्टेल्थ तंत्रज्ञानयुक्त लढाऊ विमाने विकसित करत आहेत. भारत आता या यादीत सामील होण्याच्या दिशेने निर्णायक पावले टाकत आहे.या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाअंतर्गत 'ॲडव्हान्स्ड मीडियम कॉम्बॅट एअरक्राफ्ट' हे लढाऊ विमान विकसित करण्यात येणार असून, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या प्रकल्पाच्या मॉडेलला मान्यता दिली आहे. या प्रकल्पाची जबाबदारी भारत सरकारच्या 'एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सी' कडे सोपवण्यात आली आहे.

ही संस्था देशातील नामांकित खाजगी कंपन्यांच्या सहकार्याने एएमसीए चे प्रोटोटाइप तयार करणार आहे. या प्रक्रियेसाठी लवकरच 'इन्स्ट्रुमेंट ऑफ इंटरेस्ट' जारी केले जाणार आहे, अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली.

मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे, स्वदेशी क्षमतांचा वापर करून विकसित होणारे हे स्टेल्थ फायटर जेट भारताच्या एरोस्पेस क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक मैलाचा दगड ठरेल.

हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) या सरकारी कंपनीला लढाऊ विमान व हेलिकॉप्टर निर्मितीचा मोठा अनुभव असून, एचएएल नेच 'तेजस' हे भारतातील पहिले हलके लढाऊ विमान विकसित केले होते. सध्या 'तेजस' भारतीय हवाई दल आणि नौदलाच्या ताफ्यात कार्यरत आहे. एचएएल व्यतिरिक्त टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टम्स लिमिटेडसारख्या खाजगी कंपन्याही संरक्षण क्षेत्रात सक्रीय असून, अशा कंपन्यांच्या सहभागामुळे एएमसी प्रकल्पाला बळ मिळणार आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे.

मार्च २०२४ मध्ये सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीने एएमसी च्या डिझाईन व निर्मितीला अधिकृत मंजुरी दिली होती. फेब्रुवारी २०२५ मध्ये आयोजित 'एअरो इंडिया' प्रदर्शनात एडीए ने या लढाऊ विमानाचे एकल-सीट, दुहेरी इंजिन असलेले मॉडेल सादर केले होते.मीडिया रिपोर्ट्सनुसार, योजनेनुसार २०३५ मध्ये या स्टेल्थ विमानांचे उत्पादन सुरू होण्याची शक्यता असून, प्रारंभी किमान १२० विमाने तयार केली जाणार आहेत.

भारत आणि पाकिस्तानमधील अलीकडच्या संघर्षातून हवाई दलाचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. संरक्षण विश्लेषक राहुल बेदी म्हणतात, अलीकडील संघर्ष मुख्यतः हवाई दलांमध्येच झाला. या चार दिवसांच्या संघर्षात लढाऊ विमाने, ड्रोन, क्षेपणास्त्रे आणि हवाई संरक्षण प्रणालींचा व्यापक वापर झाला.

ते पुढे म्हणाले की, सध्या भारत व पाकिस्तानकडे चौथ्या व साडेचौथ्या पिढीतील विमाने आहेत. त्यामुळे भारताचे लक्ष आता पाचव्या पिढीतील स्टेल्थ विमाने विकसित करण्यावर केंद्रित झाले आहे. या प्रकल्पामुळे भूसेनेच्या तुलनेत हवाई दलाचे महत्त्व अधिक ठळकपणे दिसून येईल.

संरक्षण तज्ज्ञ प्रवीण साहनी यांच्या मते, भारतासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरतो आहे कारण चीनने पाकिस्तानला पाचव्या पिढीतील जे ३५ ए स्टेल्थ फायटर विमाने देण्याचा निर्णय घेतल्याचे माध्यमांमध्ये समोर आले आहे. साहनी म्हणतात, जर पाकिस्तानकडे जे ३५ ए सारखी विमाने आली, तर भारत-पाकिस्तान तणावात प्रथमच स्टेल्थ विमानांचा वापर होईल. ही भारतासाठी एक गंभीर सुरक्षा चिंता असेल. सध्या भारताकडे असे कोणतेही पाचव्या पिढीतील विमान नाही. त्यामुळे या नव्या विमान प्रकल्पाला वेग आणि प्राधान्य देणे काळाची गरज आहे.